N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** जवाहर नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0112 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/05/2023 01:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 09/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/05/2023
**Time From (वेळेपासून):** 16:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/05/2023 **Time (वेळ):** 01:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/05/2023 01:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कर संकलन कार्यालय मनपा शहानुरव,वार्ड क्र8 मुयरबन कॉलनी,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुजितकुमार उत्तमराव फुलवरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एन-2 सिडको, धुत हस्पीटल जवळ,घर क्र क्यु 10/7, तथागत कॉं, औरंगाबाद,जवाहर नगर,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एन-2 सिडको, धुत हस्पीटल जवळ,घर क्र क्यु 10/7, तथागत कॉं, औरंगाबाद,जवाहर नगर,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9422996933

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप शिवराम गराडे | | | 1. शिवाजीनगर,सिएल-5-362, 12 वी योजना ,औरंगाबाद, जवाहर नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.सुरेंद्र रमेशराव रुपदे | | | 1. शिवाजीनगर, ए-20/01, 11 वी योजना,औरंगाबाद,पुंडलीक नगर,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी दिनांक 9/05/2023 मी खाली सही करणार सुजितकुमार उत्तमराव फुलवरे वय 53 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-क्राईम फोटोग्राफर, रा.घर क्र. क्यु 10/7, तथागत कॉलोनी, एन-2 सिडको, धुत हॉस्पीटल जवळ, औरंगाबाद मो.क्र. 9422996933
समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 09/05/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांचे समक्ष ला.प्र.वि.औरंगाबाद येथे त्यांचे कक्षात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे...
समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांचे कक्षात हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील प्रमाणे असुन तथागत कॉलेनी येथे कुटुंबासह राहतो. तसेच क्राईम फोटोग्राफर म्हणुन नौकरी करुन माझे कुटूंबाचा उदर निर्वाह करतो.
डिसेंबर 2016 मध्ये मी ऐशियाड -2, गट नं. 119, देवळाई परिसर औरंगाबाद या ठिकाणी प्लॉट नं. 99 माझे स्वत:चे नावे खरेदी केला होता. सदर प्लॉटवर आता मला घराचे बांधकाम करणे आहे. त्या करिता वार्ड कार्यालय क्रं. 8 येथुन टॅक्स पावती बांधकाम विभाग म.न.पा.औरंगाबाद येथे दाखल करणे आवश्यक असल्याने मी दिनांक दि. 28/03/2023 रोजी टॅक्स पावती मिळावी म्हणुन एक लेखीअर्ज कागदपत्रासह वार्ड अधिकारी, वार्ड क्र. 8 मनपा औरंगाबाद कार्यालयास सादर केला होता. सदरचे काम कार्यालयातील कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांचेकडे असल्याने मी त्याच दिवशी त्यांची समक्ष भेट घेवुन टॅक्स पावती लवकरात लवकर तयार करुन देण्या बाबत विनंती करुन त्यांना संपर्क करण्या करिता त्यांचा मोबाईल क्रमांक 9673148979 घेतला होता. त्यानंतर मी वेळोवेळी श्री. प्रदिप गराडे यांचेशी संपर्क साधुन प्लॉटची टॅक्स पावती देण्या संदर्भात विनंती करत होतो. दरम्याण कालावधीत माझ्या आर्किटेक कडुन प्लॉटच्या बेबाकी प्रमाणत्राचीही अवश्यकता असल्याचे मला सांगण्यात आले.
दिनांक 03/05/2023 रोजी सकाळी श्री. प्रदिप गराडे यांचा माझ्या मोबाईल वर फोन आला व त्यांनी मला कार्यालयात भेटण्यास बोलावले त्यावरुन मी वार्ड क्र. 8 मनपा. कार्यालय औरंगाबाद येथे जावुन श्री. प्रदिप गराडे यांची समक्ष भेट घेतली व त्यांना मला टॅक्स पावती बरोबरच बेबाकी प्रमणपत्र ही हवे असल्याचे तोंडी सांगितले त्यावर श्री. प्रदिप गराडे हे मला म्हणाले की, मी टॅक्स पावती व बेबाकी प्रमाणपत्र दोन्ही तयार करुन देतो त्या करिता दोन्ही कामाचे मिळुन मला 8000/-रुपये लागतील त्यात टॅक्स पावती तयार असुन त्याचे 5000/-रुपये आता दयावे लागेल असे म्हणाले. मला टॅक्स पावतीची अवश्यकता असल्याने मी त्यांना 5000/-रुपये दिले. त्यावेळी श्री. प्रदिप गराडे यांनी मला तात्काळ प्लॉटची टॅक्स पावती दिली.
टॅक्स पावती मिळाल्या नंतर दि.04/05/2023 रोजी मी वार्ड अधिकारी, वार्ड क्र. 8 मनपा औरंगाबाद कार्यालयास बेबाकी प्रमाणपत्र मिळण्या करिता परत एक लेखी अर्जासह कागदपत्र दाखल करुन एक ओसी प्रत घेतली व वार्ड कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांना संपर्क करुन बेबाकी प्रमाणपत्र तयार करुन देण्याची विनंती केली होती. तिन दिवस होवुनही प्रमाणपत्र न मिळाल्याने मी दिनांक 08/05/2023 रोजी मी वार्ड कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांना संपर्क करुन बेबाकी प्रमाणपत्रा बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, उदया दिनांक 09/05/2023 रोजी तुम्ही कार्यालयात या माझ्या घरी लग्न असल्याने मी उदया कार्यालयात नाही त्यामुळे तुम्ही कार्यालयातील कर्मचारी श्री.रुपदे यांना भेटा त्यांना राहिलेले 3000/- रुपये दया मी त्याना बेबाकी प्रमाणपत्र देण्याचे सांगितले आहे असे म्हणाले. परंतु मला वार्ड क्र.8 मनपा कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे.

तरी आज दिनांक 09/05/2023 रोजी मला वार्ड क्र.8 मनपा कर्मचारी श्री. प्रदिप गराडे, यांनी वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी येथे श्री. रुपदे यांना भेटण्यास सांगितले आहे त्यावेळी श्री. गराडे व श्री रुपदे हे माझ्याकडे पैश्याची मागणी करुन लाच रक्कम स्विकारणार आहे. माझी वार्ड क्र.8 मनपा कर्मचारी श्री. प्रदिप गराडे व श्री.रुपदे यांचेशी कोणत्याही प्रकारचे वैर अगर दुश्मनी नसुन माझा व त्यांचा कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा किंवा पैसे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. तरी वार्ड क्र.8 मनपा कर्मचारी श्री. प्रदिप गराडे व श्री.रुपदे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा ईतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 श्रीमती छाया गजानन पागांरकर, वय 50 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-लिपीक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद, व पंच क्र. 2. श्री. गोविंद दशरथ सुराशे वय 33 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय औरंगाबाद, असा आमचा ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी पंच व पो.नि.श्रीमती सौदागर यांना माझी वर नमुद तक्रार थोडक्यात तोंडी सांगुण लेखी तक्रार दिली त्यावर मी, दोन्ही पंचानी व पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी स्वाक्षरी केल्या.

माझ्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 09/05/2023 रोजी पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी शासकिय पंच व सर्वानुमते वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी येथे नेमणुकीस असलेले कर्मचारी श्री. प्रदिप गराडे व श्री.रुपदे यांची सदर ठिकाणी जावनु लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने सुरक्षीत ठिकाणावरुन खाजगी वाहनाने रवाना होवुन वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी औरंगाबाद चे आलीकडे सुरक्षीत ठिकाणी थांबलो तेथुन माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र. पंच क्र. 1 श्रीमती छाया पागांरकर, पद-लिपीक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद, यांचेसह आम्हाला माझे खाजगी चारचाकी वाहनाने रवाना केले. वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी औरंगाबाद येथे गेल्यानंतर आम्ही कर्मचारी श्री. रुपदे, यांना फोनव्दारे संपर्क केला असता कर्मचारी श्री. रुपदे, म्हणाले की, मी हेडऑफीसला आलो आहे, तुम्ही थांबा मी तिथेच येतो परत असे म्हणाला त्यावर मी पंच क्र. 1 यांचेसह वार्ड क्र. 8 चे कार्यालया बाहेर थांबलो थोडया वेळाने श्री. रुपदे हे कार्यालयात आले व मला कार्यालयात बोलावुन त्या ठिकाणी श्री. रुपदे यांनी मला बेबाकी प्रमाणपत्र दिले व म्हणाले की, त्यांनी 3000/-रुपये घ्यायचे सांगितले मी त्यावर त्यांना फोन करा असे म्हणलो असता श्री. रुपदे यांनी श्री गराडे यांना फोनकरुन फोनचा आवाज स्पिकर मोडवर करुन बोलले असता श्री. गराडे हे फोनवर म्हणाले की, त्याचेकडे 3000/-रुपये दया असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना म्हणालो की मी आता आनले नाही. थोडयावेळात आनुण देतो त्यावर श्री. गराडे म्हणाले की, चालल, असे म्हणुन पैश्याची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे., सदर लाचेची रक्कम लगेचच वार्ड क्र. 8 कार्यालयात घेवुन येण्याचे सांगितले आहे.

त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो व सापळा अधिकारी पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांना पंचानी व मी सर्व हकिगत सांगितली त्यावरुन सर्वानुमते लगेचच दिनांक 09/05/2023 रोजी वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी औरंगाबाद येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी वार्ड क्र.8कर्मचारी श्री. रुपदे यांना लाच म्हणुन देण्या करिता मी हजर केलेली 3000/- रुपये रक्कम ज्यात 500/-रुपये दराच्या 6 नोटा त्यांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्रीमती छाया पागांरकर असे अम्हाला श्री. रुपदे यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना केले. मी पंच क्र.1 श्रीमती छाया पागांरकर असे माझ्या खाजगी वाहनाने वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी औरंगाबाद येथे श्री.रुपदे यांना कार्यालया मध्ये भेटलो व म्हणालो की, हे घ्या श्री गराडे यांनी तुम्हाला फोनवर सांगितल्या प्रमाणे व तुम्ही मागितल्या प्रमाणे 3000/-हजार रुपये आहे मोजुन घ्या, असे म्हणुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून श्री.रुपदे यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे हातामध्ये ठेवली. लाचेची रक्कम 16.55 वाजेच्या सुमारास स्विकारल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकातिल अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले. व पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी श्री.रुपदे, वार्ड कर्मचारी यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.सुरेंद्र रमेशराव रुपदे वय 34 वर्षे, पद-वसुली कर्मचारी , कंत्राटी कर्मचारी वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा. ए-20/01, 11 वी योजन, शिवाजीनगर औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर श्री. सुरेंद्र रुपदे यांना श्रीमती रेशमा सौदागर पोलीस निरीक्षक यांचे सुचनेवरुन कर्मचारी श्री.

रुपदे यांनी श्री.प्रदिप गराडे यांना फोनवर संपर्क करुन भेट घेण्याबाबत विचारपुस केली असता श्री.गराडे यांनी सांगितले की, ते विजय चौक, विजय नगर, गारखेडा परिसर औरंगाबाद या ठिकाणी आहेत. त्यावर आम्ही शासकिय पंच, व सापळा पथक असे सदर ठिकाणी जावुन श्री.प्रदिप गराडे यांना ताब्यात घेवुन श्रीमती सौदागर पो.नि. यांनी आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रदिप शिवराम गराडे वय 33 वर्षे, पद-वसुली कर्मचारी, वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा.सिएल-5-362, 12 वी योजना शिवाजीनगर औरंगाबाद असे सांगितले. सदरचे ठिकाण हे वर्दळीचे असल्याने सापळा पथक दोन्ही पंच मी व श्री. गराडे आणि श्री.रुपदे असे तेथुन निघून पोलीस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय औरंगाबाद येथे आलो. सदर घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

तरी दिनांक 09/05/2023 रोजी 16.55 वाजेच्या सुमारास वार्ड क्र.8 मुयरबन कॉलनी, कर संकलन कार्यालय मनपा शहानुरवाडी औरंगाबाद येथे वार्ड क्र.8 चे वसुली कर्मचारी श्री. प्रदिप शिवराम गराडे यांनी मला माझे ऐशियाड -2, गट नं. 119, देवळाई परिसरातील प्लॉट नं. 99 चे बेबाकी प्रमाणत्र देण्यासाठी म्हणुन माझ्याकडे 3000/- रुपयाची मागणी करुन वसुली कर्मचारी श्री. सुरेंद्र रमेशराव रुपदे यांचेकडे देण्याबाबत सांगितले. त्यावर मी वसुली कर्मचारी श्री. सुरेंद्र रुपदे यांना भेटलो असता त्यांनीही श्री. प्रदिप गराडे यांनी सांगितलेले 3000/-रुपयाची मागणी करुन सदर 3000/-रुपये लाच रक्कम माझ्याकडुन स्वत: श्री. रुपदे यांनी पंचसाक्षीदारा समक्ष स्विकारली आहे. तरी वार्ड क्र. 8 चे वसुली कर्मचारी श्री. प्रदिप शिवराम गराडे व श्री. सुरेंद्र रमेशराव रुपदे यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. म्हणुन गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी मा. पोनिसो, यांचे आदेशाने पो.नि. श्रीमती रेश्मा सौदागर(ला.प्र.वि. औरंगाबाद) यांचेकडे दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
VENKAT MADHAVRAO KENDRE(I (Inspector)) / BOBN53382

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ड्युटी ऑफिसर
पो.स्टे.जवाहर नगर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** VENKAT MADHAVRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN53382